# भारतीय नौदलाचे योगदान

**भविष्याचा** अंदाज बांधणे केवळ अशक्य आहे. आपण सध्याच्या ज्या आव्हानांचा सामना करण्याचे नियोजन करत आहोत, त्यापेक्षा वेगळ्या आव्हानांना तोंड देण्याची अपरिहार्यता, हीच शाश्वत गोष्ट आहे. भारत महत्त्वाच्या आर्थिक परिवर्तनाच्या कालखंडातून प्रवास करत आहे आणि जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून उदयाला येण्याच्या प्रयत्नात आहे. हा आर्थिक विकास मोठ्या प्रमाणातील कुशल मनुष्यबळाच्या आधारावर आहे, ज्याला मोदी सरकारच्या अनुकूल धोरणांचा पाठिंबा आहे. जागतिक आर्थिक मंचावर एक प्रमुख भूमिका बजावण्यासाठी प्रयत्नशील असताना, भारताने स्वतःला एक प्रमुख उत्पादन केंद्र म्हणून प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, ही गोष्ट स्पष्ट आहे. हा दृष्टिकोन साकारण्यासाठी, संरक्षण उत्पादन क्षेत्राचा मोठा विकास महत्त्वाचा आहे. यातून केवळ सशस्त्र दलांच्या आत्मनिर्भरतेचे उद्दिष्ट साध्य होणार नसून, देशाच्या सर्वांगीण आर्थिक विकासालाही बळ मिळेल.

संरक्षण उत्पादन धोरण आणि IDEX (संरक्षण उत्कृष्टतेसाठी नवोन्मेष), टीडीएफ (तंत्रज्ञान विकास निधी) यांसारखे प्रमुख कार्यक्रम आणि उपक्रम या परिवर्तनाच्या प्रवासातील प्रमुख घटक आहेत. IDEX, एक अल्प आणि मध्यम मुदतीची रणनीती म्हणून सादर करण्यात आली असून, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते DefExpo २०१८ दरम्यान त्याचा अधिकृतपणे शुभारंभ करण्यात आला. संरक्षण उत्कृष्टतेसाठी नवोन्मेषाची चौकट काळजीपूर्वक तयार करण्यात आली आणि त्यानंतर संरक्षण मंत्रालयाने त्याला मंजुरी दिली. ही यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी डिफेन्स इनोव्हेशन ऑर्गनायझेशन (डीआयओ) ही विभाग ८ ची कंपनी म्हणून स्थापन करण्यात सआली. कंपनी कायदा २०१३ च्या नियमांनुसार 'ना-नफा' संस्था म्हणून कार्यरत असलेल्या या कंपनीला सरकारने ५ वर्षांच्या कालावधीसाठी ४९८.८ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य दिले आहे. संरक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या सुमारे ३०० स्टार्टअप्स, एमएसएमई आणि वैयक्तिक नवोन्मेषींना महत्त्वाचे पाठबळ प्रदान करण्यासाठी हे अर्थसहाय्य देण्यात आले असून, यामुळे भारताच्या संरक्षण क्षेत्रातील नवोन्मेष आणि आत्मनिर्भरतेच्या उद्दिष्टपूर्तीला बळ मिळेल.

भारताच्या संरक्षण आणि एरोस्पेस (हवाई) क्षेत्रांसाठी डिझाइन केलेल्या नवोन्मेषी तंत्रज्ञानाच्या विकासाला गती देणे हा या उपक्रमांचा प्राथमिक उद्देश आहे, ज्यामुळे त्याची जलद अंमलबजावणी होईल. याव्यतिरिक्त, संरक्षण आणि एरोस्पेस प्रकल्पांमधील सहयोगी प्रयत्नांना प्रोत्साहन देणे, नवीन स्टार्ट-अप्ससह भागीदारी विकसित करणे हे याचे उद्दिष्ट आहे. हा उपक्रम सक्रिय सहभाग आणि ज्ञानाची देवाण-घेवाण करायला प्रोत्साहन देईल आणि या क्षेत्रात सह-निर्मिती आणि सह-नवोन्मेषाच्या संस्कृतीला चालना देईल. एकूणच, हा उपक्रम स्टार्ट-अप्समधील नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्याचा आणि त्यांना भारताच्या संरक्षण आणि एरोस्पेस परिसंस्थेमध्ये एकरूप करण्याचा तसेच या महत्त्वाच्या क्षेत्रांचा विकास करून प्रगतीला चालना देण्याचा प्रयत्न करतो.

तंत्रज्ञानातील सुधारणेचा वेग पाहता, विशेषत: युद्धाच्या संदर्भात, भारतीय नौदलाला तांत्रिक प्रगतीमध्ये आघाडीवर राहण्याची गरज आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये भारतीय नौदलाने स्प्रिंट उपक्रमाद्वारे नवोन्मेषाचा अवलंब केला आहे. नवीन उपकरणे समाविष्ट करून जागतिक स्तरावर तैनातीसाठी स्वायत्त आणि चालकदलरहित (क्रूलेस) तंत्रज्ञान तयार करण्यात आले आहे. भारतातील मोठ्या खासगी कंपन्या दैनंदिन मथळे बनवत असताना, मेक इन इंडिया उपक्रमाची उद्दिष्टे साध्य करण्यात मोठे संरक्षण समूह महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत, हे नोंद घेण्याजोगे आहे. तथापि, भारतीय सशस्त्र दल, विशेषत: भारतीय नौदलाकडून सक्रिय भागधारकांच्या सहाय्याने सुलभ स्टार्ट-अप आणि एमएसएमईना उल्लेखनीय समर्थन मिळत आहे. भारतातील संरक्षण क्षेत्र हे औद्योगिक परवाना, सुरक्षाविषयक मंजुरी आणि संरक्षण खरेदी धोरणांसह कठोर नियम आणि मानकांच्या आधारावर काम करते. ही आव्हाने असूनही समर्थन, मार्गदर्शन आणि वापरकर्त्यांच्या अभिप्रायासह संरक्षण स्टार्ट-अपसाठी प्रक्रिया वेगवान केली जात आहे. जहाजबांधणी उद्योग, हे एक कौशल्यपूर्ण काम असून, यामध्ये मोठ्या संख्येने मनुष्यबळ गुंतवणुकीचा समावेश आहे, हे व्यासपीठ अधिक प्रगत झाल्यामुळे यामधील जटिलता वाढताना दिसत आहे. या जटिलतेमध्ये सागरी क्षेत्रासाठी योग्य दर्जाचे दिवे ते रडार, हेलिकॉप्टर ते पाण्याखालील दूर संवाद यंत्रणा आणि टॉर्पिडोपासून क्षेपणास्त्रांपर्यंत सर्व प्रकारच्या कंपन्यांची भागीदारी आवश्यक आहे. इनोव्हेशन स्टार्ट-अप चॅलेंज (SPRINT)ने सुरुवातीपासूनच भारताच्या संरक्षण आणि एरोस्पेस क्षेत्रात नवोन्मेषाला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. याने विविध प्रकारच्या स्टार्ट-अप्स, एमएसएमई, नवोन्मेषी, थिंक टँक आणि शैक्षणिक संस्थांना आकर्षित केले आहे, ज्याने भारताचे वाढते स्टार्ट-अप परिप्रेक्ष समृद्ध केले आहे आणि संरक्षण क्षेत्रातील नवोन्मेषाला प्रोत्साहन दिले आहे.

भारताच्या स्टार्ट-अप इकोसिस्टीमवरील स्प्रिंटचा प्रभाव सहभागी कंपन्यांच्या भौगोलिक वितरणामधून आणि ए अँड डी स्टार्ट-अपच्या २०२२ नंतरच्या वाढीमधून दिसून येतो. समस्या विधानांचे वर्गीकरण स्प्रिंटच्या नावीन्यपूर्णतेची व्यापकता अधोरेखित करते. हा कार्यक्रम स्टार्ट-अप, सरकारी संस्था आणि संरक्षण संस्था यांच्यातील सहयोगी प्रयत्नांच्या सामर्थ्याचे उदाहरण देतो, जे केवळ अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासाला गती देत नाही, तर जागतिक संरक्षण आणि एरोस्पेस क्षेत्रातील एक उगवती शक्ती म्हणून भारताचे स्थान मजबूत करते.

'विकसित भारत ॅ२०४७' हे स्वातंत्र्याच्या १००व्या वर्षांत २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याच्या पंतप्रधान मोदींच्या संकल्पनेला मूर्त रूप देते. या दृष्टिकोनामध्ये आर्थिक विकास, सामाजिक प्रगती, पर्यावरणीय शाश्वतता आणि सुशासन यासह विकासाच्या विविध पैलूंचा समावेश आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत, भारतीय नौदलाने २०४७ पर्यंत पूर्णपणे 'आत्मनिर्भर' होण्यासाठी स्वतःला वचनबद्ध केले आहे, हा एक धोरणात्मक निर्णय आहे, जो आधीच पूर्ण क्षमतेने कार्यरत असलेल्या भारतीय नौदलाला मोठे प्रोत्साहन देत आहे. यामुळे तरुण पिढीसाठी कर्मचारी आणि रोजगार निर्माते अशा दोन्ही संधी निर्माण झाल्या आहेत.

नौदल प्रमुख ॲडमिरल हरी कुमार यांनी आत्मनिर्भरतेचे प्रयोजन स्पष्ट करताना केवळ तांत्रिक विकास साधण्यावर समाधानी न राहता, त्यापलीकडे प्रगती करण्याची गरज अधोरेखित केली होती. भारतीय नौदलाने भविष्यात मानवरहित आणि स्वायत्त क्षमतांचा समावेश करण्याची योजना आखली आहे, ज्यामुळे भारतीय सागरी क्षेत्रातील धोक्यांचा प्रभावीपणे सामना करण्याची नौदलाची क्षमता वाढेल. स्प्रिंट विजेत्यांना केवळ भारतातूनच नव्हे, तर परदेशातूनही मागणी (ऑर्डर) मिळत आहे, हे या दृष्टिकोनाचा मूर्त परिणाम प्रतिबिंबित करतात. संरक्षण मंत्र्यांनी म्हटले आहे की, 'सामर्थ्यवान सैन्य केवळ सीमा सुरक्षित करत नाही, तर देशाची संस्कृती आणि अर्थव्यवस्थेचे रक्षण करते. एक मजबूत, स्वावलंबी आणि समृद्ध राष्ट्र तयार करणे हे ध्येय आहे, जे स्वतःच्या तसेच मित्र देशांच्या गरजा पूर्ण करेल. हा नवजागरणाचा काळ आहे. भारताला जागतिक महासत्ता म्हणून पुन्हा प्रस्थापित करण्याची हीच वेळ आहे.' हा दृष्टिकोन आकांक्षी आणि प्रेरणादायी असून, सहयोगी प्रयत्नांनी तो साध्य करता येण्याजोगा आहे.

# खट्टर गेले, सैनी आले...

**सारा** देश लोकसभा निवडणुका कधी जाहीर होणार, याची वाट बघत असताना, अचानक हरयाणामध्ये भाजपाने नेतृत्वबदल केला आणि राजकारणातील अनेकांची मती गुंग झाली. तसे बघितले तर हरयाणा हे एक छोटे राज्य आहे. १९६६ मध्ये पंजाबपासून हा प्रदेश वेगळा करून नवीन राज्य निर्माण करण्यात आले. राजधानी दिल्लीच्या सीमेवर असल्याने महत्त्वाचे राज्य आहेच. पण जाट समाजाचा प्रभाव हे त्याचे वेगळेपण आहे. एकीकडे हरयाणातील गुरुग्राम सायबर सिटी म्हणून देशाच्या नकाशावर आहे व दुसरीकडे जाट आरक्षण आणि शेतकरी आंदोलनाने या राज्याचे नाव माध्यमांमध्ये सतत झळकत असते. राज्याच्या विधानसभेत ९० जागा आहेत, तर लोकसभेचे १० मतदारसंघ या राज्यात आहेत. केंद्रात मोदी सरकार आल्यापासून म्हणजेच सन २०१४ पासून हरयाणा राज्यावर भारतीय जनता पक्षाचा कब्जा आहे.

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेस व भाजपाच्या उमेदवारांची नावे जाहीर होत असताना मनोहरलाल खट्टर यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला व त्यांच्या जागी नायबसिंह सैनी यांनी हरयाणाचा राजमुकुट मस्तकावर चढवला. हे सर्व वेगाने घडले. अचानक असे काय घडले की, भाजपाच्या श्रेष्ठींना हरयाणाच्या नेतृत्वात लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर बदल घडवावासा वाटला? मुळातच मनोहरलाल खट्टर हे कोणी लढाऊ नेते नाहीत. ते संघाचे प्रचारक व स्वयंसेवक हीच त्यांची ओळख आहे. ज्याला प्रशासकीय कसलाही अनुभव नाही, ज्याने कधी सत्तेच्या राजकारणात भाग घेतलेला नाही, त्याला मोदी-शहांनी थेट राज्याच्या मुख्यमंत्रीपदावर बसवले. खट्टर हे सरळमार्गी आहेत. त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे कधी थेट आरोप झाले नाहीत. पण मुख्यमंत्री म्हणून ते आपल्या कामगिरीचा ठसा उमटवू शकले नाहीत. मोदी-शहांची निवड म्हणून ते थेट मुख्यमंत्रीपदाच्या सिंहासनावर बसले व लोकसभा निवडणुकीत ते पक्षाला शंभर टक्के यश देऊ शकणार नाहीत, हे जेव्हा लक्षात आले, तेव्हा त्यांना हरयाणाच्या सर्वोच्च पदावरून क्षणार्धात पायउतार करण्यात आले. खट्टर हे संघ स्वयंसेवक असल्याने ते रुसणार नाहीत. कशाला नाही म्हणणार नाहीत. पक्ष जबाबदारी देईल, ती ते प्रामाणिकपणे पार पाडतील. आता त्यांना हरयाणातून पक्षाने लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून घोषित केले आहे. कालपर्यंत मुख्यमंत्रीपदावर असलेले खट्टर हे दोन महिन्यांनी लोकसभेत खासदार दिसतील. तसेच काल-परवापर्यंत लोकसभेत खासदार असलेले नायबसिंह सैनी यांची अचानक लॉटरी लागली व ते हरयाणाच्या मुख्यमंत्रीपदावर विराजमान झाले. जसा खट्टर यांचा साडेनऊ वर्षांपूर्वी मुख्यमंत्री म्हणून प्रवेश अचानक झाला होता, तसाच त्यांचा राजीनामाही अचानक झाला. आदल्या दिवशी हरयाणामधील कार्यक्रमात खट्टर व पंतप्रधान नरेंद्र मोदी एकत्र होते. खट्टर यांनी राज्याच्या विकासाला गती दिली म्हणून पंतप्रधानांनी त्यांच्यावर प्रशंसेचा वर्षाव केला. आपण व खट्टर प्रचारक म्हणून राज्यात स्कूटरवरून कसे सर्वत्र फिरलो, याच्याही रम्य आठवणी सांगितल्या. त्यावेळी खट्टर यांना आपल्याला दुसऱ्याच दिवशी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची पाळी येणार आहे, याची पुसटशीसुद्धा कल्पना नव्हती.

सन २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत हरयाणातील सर्व १० लोकसभा मतदारसंघांत भाजपाचे खासदार विजयी झाले. त्या निवडणुकीत भाजपाला ५८ टक्के मते मिळाली होती. पण नंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतांच्या टक्केवारीत लक्षणीय घसरण झाली व भाजपाला विधानसभेत बहुमताचा आकडा गाठता आला नाही. म्हणूनच दुष्यंत चौटाला यांच्या हरयाणा जननायक पक्षाला बरोबर घेऊन मनोहरलाल खट्टर यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने सरकार स्थापन केले. चौटाला यांना उपमुख्यमंत्रीपद दिले. सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्राप्रमाणेच हरयाणातही मतदारांनी भाजपाला स्पष्ट बहुमत दिले नव्हते.

येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत दुष्यंत चौटाला यांनी हरयाणात आपल्या पक्षाला दोन जागा मिळाव्यात, अशी भाजपाकडे मागणी केली. भाजपाने ती फेटाळून लावताच त्यांनी सरकारमधून अंग काढून घेतले. तरीही अपक्षांच्या पाठिंब्यावर खट्टर सरकारकडे बहुमत होते. पण त्यांनाच पक्षाने राजीनामा द्यायला सांगितले व नायबसिंह सैनी यांच्यावर नवे कप्तान म्हणून जबाबदारी सोपवली.

हरयाणा हे राज्य जाटबहुल आहे. खट्टर हे पंजाबी होते, तर आता सैनी हे ओबीसी आहेत. राज्यात जाट प्रभावशाली असले तरी ओबीसींची लोकसंख्या मोठी आहे. म्हणूनच भाजपाने

बिगर जाट मुख्यमंत्री देण्याचे दुसऱ्यांदा धाडस केले आहे.

खट्टर हे साडेनऊ वर्षे मुख्यमंत्री होते. त्यांनीच सैनी यांना राजकारणात महत्त्व दिले. खट्टर यांच्या पहिल्या टर्ममध्ये सैनी हे त्यांच्या सरकारमध्ये मंत्री होते. सैनी हे अंबाला जिल्ह्यातील मिर्झापूरमधील मिर्झा गावाचे. जन्म २५ जानेवारी १९७०. मुजफ्फरपूरच्या डॉ. आंबेडकर विद्यापीठातून ते बीए झाले. नंतर येथील चौधरी चरणसिंग विद्यापीठातून त्यांनी कायद्याची पदवी घेतली. १९९६ पासून ते संघ-भाजपा परिवाराकडे आकर्षित झाले. सन २००२ मध्ये ते भाजपा युवा मोर्चाचे सरचिटणीस होते. २००५ मध्ये युवा मोर्चाचे अध्यक्ष झाले. २००९ मध्ये नारायणगढ मतदारसंघातून त्यांनी विधानसभेची निवडणूक लढवली. त्या मतदारसंघात भाजपाला कधीच यश मिळाले नव्हते. पहिल्या निवडणुकीत तर सैनी यांना पाचव्या क्रमांकाची मते मिळाली. पण २०१४ मध्ये मोदी लाटेत त्यांनी काँग्रेस उमेदवाराला २४ हजार मतांनी पराभव केला व खट्टर यांनी आपल्या सरकारमध्ये त्यांना मंत्री केले. २०१४ ते २०१९ ते राज्यात कॅबिनेट मंत्री होते. २०१९ मध्ये त्यांनी भाजपाच्या तिकिटावर कुरूक्षेत्रमधून लोकसभा निवडणूक लढवली व ४ लाख मतांनी विजय संपादन करून ते खासदार झाले.

हरयाणामध्ये जाटांचे वर्चस्व असले तरी जाट मतदार हा काँग्रेस, हरयाणा जननायक पार्टी व इंडियन नॅशनल लोकदल या पक्षात विभाजित आहे. हरयाणात ओबीसी लोकसंख्या २८ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. ओबीसी मतदार हा प्रामुख्याने भाजपाच्या पाठीशी असल्यानेच बिगर जाट मुख्यमंत्री देण्याचे धाडस भाजपाने दाखवले आहे. मनोहरलाल खट्टर हे राजकारणी नाहीत, पण त्यांना सार्वजनिक जीवनात आदराचे स्थान आहे. म्हणूनच सैनी यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर ते सर्वांसमक्ष खट्टर यांच्या पाया पडले व त्यांना चरणस्पर्श करून त्यांचे आशीर्वाद घेतले.

केंद्रात भाजपा सत्तेवर असताना निवडणुकीपूर्वी देशात राज्यांच्या नेतृत्वात बदल घडविण्याच्या यापूर्वी चार घटना घडल्या आहेत. गुजरातमध्ये विजय रूपाणी यांना मुख्यमंत्रीपदावरून हटवून भूपेंद्र पटेल यांच्या मस्तकार राजमुकुट ठेवण्यात आला. त्रिपुरात विप्लब दास यांना हटवून माणिक सरकार यांना मुख्यमंत्री करण्यात आले. उत्तराखंडमध्ये त्रिवेंद्र सिंह रावत यांना दूर करून तीर्थ सिंह रावत व नंतर त्यांनाही हटवून पुष्कर सिंह धामी यांच्यावर मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. कर्नाटकमध्ये बी. एस येडियुरप्पा यांना हटवून बसवराज बोम्मई यांना मुख्यमंत्रीपदावर बसविण्यात आले. आता असाच प्रयोग हरयाणात करण्यात आला आहे.

भाजपाने हरयाणात स्थानिक किंवा प्रादेशिक पक्षांबरोबर यापूर्वी अनेकदा युती केली आहे. जननायक जनता पार्टीच्या अगोदर बन्सीलाल यांची हरयाणा विकास पार्टी, हरयाणा जनहित काँग्रेस, इंडियन नॅशनल लोकदल यांच्याशी भाजपाने युतीचा प्रयोग केला होता. १९९८ मध्ये भाजपाने हरयाणा विकास पार्टीशी समझोता करून लोकसभा निवडणूक लढवली होती. तेव्हा दोन्ही पक्षांना प्रत्येकी दोन जागा मिळाल्या होत्या. १९९९ मध्ये भाजपाने इंडियन नॅशनल लोकदलाशी युती करून सर्व १० जागा जिंकल्या होत्या. सन २००९ मध्ये भाजपाने इनलोशी युती तोडली व स्वबळावर निवडणूक लढवली. पण पक्षाला यश मिळाले नाही. नंतर कुलदीप वैष्णोई यांच्या हरयाणा जनहित काँग्रेसबरोबरही समझोता केला, २०१४ च्या निवडणुकीपूर्वी तो तोडला. राजकीय अस्थिरतेमुळे हरयाणाने यापूर्वी तीन वेळा राष्ट्रपती राजवटीचाही अनुभव घेतला आहे.

आमदार नसलेले नायबसिंह सैनी हे हरयाणाचे चौथे मुख्यमंत्री आहेत. यापूर्वी भूपिंदर सिंह हुड्डा, बन्सीलाल, ओम प्रकाश चौटाला, हे नेते आमदार नसताना मुख्यमंत्री झाले होते.

आमदार नसलेला नेता राज्याचा सहा महिने मुख्यमंत्रीपदावर राहू शकतो. पण या काळात त्याने विधानसभेवर निवडून येणे आवश्यक आहे. हरयाणा विधानसभेचे सदस्य नसलेले सैनी आमदारकीशिवाय ११ सप्टेंबर २०२४ पर्यंत मुख्यमंत्रीपदावर राहू शकतात.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

# निर्भय व निष्पक्ष निवडणुकांसाठी प्रशासन सज्ज- जिल्हाधिकारी

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) - भारत निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणूकीसाठी कार्यक्रम जाहीर केला असून त्यानुसार चवथ्या टप्प्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात निवडणूक होणार आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार निवडणुका निर्भय व निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज आहे, अशा शब्दात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज पत्रकार परिषदेत विश्वास व्यक्त केला.



निवडणूका जाहीर होताच जिल्हा प्रशासनाच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले. प्रशासनामार्फत करण्यात आलेल्या निवडणूक सज्जतेची माहिती देण्यात आली. पत्रकार परिषदेस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस आयुक्त मनोज लोहिया, पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया, अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोलकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे तसेच अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

या पत्रकार परिषदेत जिल्हाधिकारी स्वामी यांनी निवडणूकीविषयक सर्व माहिती दिली.

**निवडणूक कार्यक्रम:**

निवडणूक आयोगाने घोषित केल्यानुसार जिल्ह्यात चवथ्या टप्प्यात निवडणूक होत आहे.

निवडणूक कार्यक्रम याप्रमाणे-

१. अधिसूचना जारी करणे- गुरुवार दि. १८ एप्रिल,

२. नामनिर्देशन पत्र सादर करण्याचा अंतिम दिनांक गुरुवार दि.२५ एप्रिल,

३. नामनिर्देशन पत्रांची छाननी शुक्रवार दि.२६ एप्रिल,

४. उमेदवारी अर्ज माघारी घेण्याचा दिनांक सोमवार दि.२९ एप्रिल,

५. मतदानाचा दिनांक सोमवार दि.१३ मे,

६. मतमोजणीचा दिनांक मंगळवार दि.४ जून,

७. निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचा दिनांक गुरुवार दि.६ जून.

**मतदार संघ व मतदान केंद्रांची रचना :** - जिल्ह्यात १८ जालना आणि १९ औरंगाबाद अशा दोन लोकसभा मतदार संघांचा समावेश आहे. त्यात जिल्ह्यातील सिल्लोड, फुलंब्री व पैठण हे विधानसभा मतदारसंघ क्षेत्र जालना लोकसभा मतदार संघास जोडलेले असून औरंगाबाद मध्य, औरंगाबाद पूर्व, औरंगाबाद पश्चिम, गंगापूर, वैजापूर आणि कन्नड हे विधानसभा मतदार संघ क्षेत्र औरंगाबाद लोकसभा मतदार संघास जोडलेले आहेत. त्यात जालना लोकसभा मतदार संघाशी जोडलेल्या क्षेत्रासाठी १०४५ तर औरंगाबाद लोकसभा मतदार संघाशी जोडलेल्या क्षेत्रासाठी २०४० असे एकूण ३०८५ मतदान केंद्रांवर मतदार आपला मतदानाचा हक्क बजावतील.

२०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या ३७ लक्ष १ हजार २८२ इतकी असून सन २०२४ ची अनुमानित लोकसंख्या ४५ लक्ष ८९ हजार ३२२ इतकी आहे.

या लोकसभा मतदार संघासाठी जालना लोकसभा मतदार संघासाठी ९ लाख ९७ हजार ५२३ तर औरंगाबाद लोकसभा मतदार संघासाठी २० लाख ३५ हजार ०२३ असे एकूण ३० लाख ३२ हजार ५४६ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावतील,असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.

**वयोगटानुसार मतदार:-**

वयवर्षे १८ ते १९ या वयोगटातील म्हणजेच नवमतदारांची संख्या ही ४१४६५, २० ते २९ वर्षे वयोगटातील-६२३४९१, ३०-३९ वयोगटातील -७५५६११, ४०-४९ वयोगटातील-६३३०५८, ५०-५९ वयोगटातील-४६८००७, ६०-६९ वयोगटातील२७५००१, ७०-७९ वयोगटातील-१५१४७४ तर ८० व त्यापेक्षा अधिक वयोगटातील - ८४४३९ असे एकूण ३० लाख ३२ हजार ५४६ मतदार आहेत.

**मतदारांसाठी मतदान केंद्रावर सुविधा:-** जिल्ह्यात ४५ मतदान केंद्र हे मॉडेल मतदान केंद्र म्हणून बनविण्यात येणार आहे. मतदान केंद्रांवर आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार सर्व सुविधा देण्यात येणार आहेत. त्यांचीही सज्जता झाली आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर मतदार सहायता कक्ष, लहान बालकांसाठी पाळणा घर, सावलीची सुविधा, पिण्याचे पाणी, औषधोपचार कक्ष, दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांसाठी आवश्यकतेनुसार व्हिल चेअर सुविधा, दिशादर्शक फलक इ. सुविधा देण्यात येणार आहात. तसेच मतदान केंद्रस्तरीय मतदार जागरुकता गट बनविण्यात येणार असून जिल्ह्यात असे २८९८ गट बनविण्यात आले असून त्याद्वारे मतदारांमध्ये मतदान करण्याविषयी जनजागृती केली जाणार आहे.

**'स्वीप'द्वारे मतदार जनजागृती:-** जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले की, जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी मतदारांमध्ये जनजागृती केली जाणार आहे. त्यासाठी विविध माध्यमातून मतदारांना मतदानाचे महत्त्व पटवून देणे, त्यांचे मतदार यादीतील नाव सापडणे, त्यांचे मतदान केंद्र नेमके कुठे आहे याबाबतही त्यांच्यासाठी सर्व माहिती देण्यात येणार आहे. मतदान केंद्रावरही मतदार सुविधा केंद्र निर्माण केले जाणार आहेत,असेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.

**आचारसंहिता अंमलबजावणी :** निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर करताच आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी सुरु झाली आहे. त्यादृष्टीने जिल्ह्यात पदाधिकाऱ्यांकडे असलेली शासकीय वाहने जमा करण्यात आले असून शासकीय, सार्वजनिक इमारतींवरील राजकीय पक्षांचे बॅनर्स, होर्डिंग्ज, झेंडे आदी सामुग्री जमा करण्यात येत आहे. त्यासाठी स्थिर सर्व्हेक्षण पथके, फिरते सर्व्हेक्षण पथके, व्हिडिओ सर्व्हेक्षण पथके, व्हिडिओ पाहणी पथके आदी नियुक्त करण्यात आले असून त्यांचे कार्यान्वयन सुरु झाले आहे,असेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले आहे. जिल्हास्तरावर तसेच प्रत्येक सहा. निवडणूक निर्णय अधिकारीस्तरावर १९५० हा टोल फ्री क्रमांकही कार्यान्वयीत करण्यात आला आहे. तसेच निवडणूक आयोगाच्या विविध ॲप द्वारेही मतदारांना विविध प्रकारची माहिती मिळण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. आचार संहिता लागू होताच जिल्ह्यातील प्रत्येक प्रिंटींग प्रेसला त्यांच्याकडे छापला जाणाऱ्या प्रत्येक कामाची माहिती जिल्हा प्रशासनाला देणे बंधनकारक असल्याचेही सांगण्यात आले. तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिने परवानाधारकांना त्यांचे शस्त्र बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध अधिनियमाचीही अंमलबजावणी करण्याचे त्यांनी सांगितले.

**'फेक न्यूज'वर विशेष लक्ष**

जाणीवपूर्वक खोटी, बनावट माहिती, व्हिडीओ, फोटो, मजकुर सोशल मिडियाद्वारे पसरवणे, जनतेमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण करणे, कायदा सुव्यवस्थेला बाधा आणण्याचा प्रयत्न करणे, धार्मिक जातीय तेढ निर्माण करणे याबाबतचे प्रयत्न रोखण्यासाठी व त्यावर कायद्याद्वारे प्रतिबंध करण्यासाठी विशेष कक्ष स्थापन करुन नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. सोशल मिडीयावरील पोस्ट इ. ची दखल घेऊन संबंधितांवर कारवाई करण्यात येईल असेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले. तसेच व्हॉट्सॲप ग्रुपच्या ॲडमिनने अशा माहितीच्या प्रसाराबाबत खातरजमा केली पाहिजे. त्यातून काही कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास ग्रुप ॲडमिनलाही जबाबदार धरले जाईल असे त्यांनी सांगितले.

**माहिती तंत्रज्ञानाचा वापर:-**

यंदाच्या लोकसभा निवडणूकीचे वैशिष्ट्य म्हणजे यावेळी माहिती तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्यात येणार असून जवळपास १५ ॲपच्या माध्यमातून प्रत्यक्ष मतदार, उमेदवार, अधिकारी, निरीक्षक अशा सर्व घटकांना या ॲपचा आपले कामकाज जलद व अचूक करणे, मतदारांना सुविधा उपलब्ध होणे, आचारसंहिता भंगाकडे लक्ष ठेवून त्याची दखल घेणे, तक्रारी नोंदविणे, कारवाई करणे अशा विविध बाबी या ॲपमुळे मोबाईलद्वारे सहज करता येणार आहेत,अशीही माहिती यावेळी देण्यात आली.

**कायदा सुव्यवस्थेसाठी सज्जता- पोलीस आयुक्त लोहिया**

निवडणूक काळात जिल्ह्यात पोलीस आयुक्त हद्दीत कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी व निर्भयतेचे वातावरण राखण्यासाठी पोलीस दलाची सज्जता असून त्यासाठी मतदान केंद्रनिहाय सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला आहे. जिल्ह्यात अतिरिक्त बंदोबस्तासाठी राज्यराखीव दलाच्या तीन तुकड्या तर केंद्रीय राखीव दलाच्या दोन तुकड्या प्राप्त होणार आहेत. तसेच संवेदनशील व जोखमीच्या मतदान केंद्रांवर वेब कास्टिंगच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येणार आहे.

**आचारसंहिता भंगाची तात्काळ दखल घेणार-विकास मीना**

जिल्ह्यात आचारसंहिता भंगाची तात्काळ दखल घेण्याची यंत्रणा सज्ज करण्यात आली असून १९५० टोल फ्रि क्रमांक, ९४ स्थिर सर्व्हेक्षण पथके, तसेच फिरते सर्व्हेक्षण पथके इ. माध्यमांतून ग्रामिण भागापासून शहरी भागापर्यंत प्रशासनाचे लक्ष आहे. त्यासाठी नागरीकही सी व्हिजील या ॲपच्या माध्यमातून आचारसंहिता भंगाच्या तक्रारी प्रशासनापर्यंत पोहोचवू शकतात, असे आचारसंहिता कक्षाचे प्रमुख तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी सांगितले.

# राज्यातील जेष्ठ नागरिकांच्या वाढत्या समस्या निकाली काढण्यासाठी मंत्रालयात स्वतंत्र विभाग उघडा

वैजापूर, दि. १८ (प्रतिनिधी) - देशात साडे चौदा कोटी जेष्ठ नागरिक आहेत व महाराष्ट्र राज्यात एक कोटी३६लक्ष जेष्ठ नागरिक आहेत,जेष्ठांच्या वाढत्या आयुर्मान सोबत त्यांच्या समस्याही वाढलेल्या आहेत. मात्र या समस्यांकडे शासनाचे वरिष्ठ अधिकारी, समाज व कुटुंबातील जबाबदार घटक कमालीचे दुर्लक्ष करीत आहेत, शासनाचे कायदे जरी असले तरी वरिष्ठ अधिकारी जेष्ठांच्या वाढत्या समस्यांकडे मोठया प्रमाणात दुर्लक्ष करीत असल्याने राज्यातील जेष्ठांचे हक्क पायदळी तुडविले जात आहेत. त्यांचा जगण्याचा हक्क हिरावून घेतला जात आहे. त्यांना सुरक्षित, निरोगी व हक्क पूर्ण जीवन उतरत्या वयात सुख, समाधानाने व निरोगीपणे



जगता यावे म्हणून महाराष्ट्र शासनाने राज्यातील एक कोटी३६लक्ष जेष्ठ नागरिकांसाठी मंत्रालयात एक स्वतंत्र विभाग व त्या विभागाचे स्वतंत्र सचिव नेमावे म्हणजे राज्यातील जेष्ट नागरिकांच्या समस्या, अडचणी व प्रश्न निकाली लागून जेष्ठांना आपल्या आयुष्यची संध्याकाळ हक्कपूर्ण सुखाने व समाधानाने जगता येईल अशी एकमुखी मागणी जालना येथील मराठवाडा विभागीय जेष्ठ नागरिक मेळाव्यात रविवार (ता.१७) रोजी राज्यभरातून आलेल्या जेष्ठ नागरिकांनी केली. जेष्ठ नागरिक व जालना जेष्ठ नागरिक सेवा संघाचे मार्गदर्शक ज्ञानेदेव पायगव्हाणे यांनी हा ठराव मेळाव्यात मांडला व सर्व उपस्थितांनी हात उंचावून याला संमती दिली. कुटुंबात मुलांबाळांकडून होणारी हेळसांड, समाजात दुय्यम स्थान, शासनाच्या सवलती मिळवण्यासाठी शासकीय अधिकारी कडून होणारी परेशानी व कमालीचे दुर्लक्ष, निराधार जेष्ठ नागरिकांच्या असुरक्षित पणाचे प्रश्न या सर्वांना वाचा फोडण्यासाठी राज्य सरकारने मंत्रालयात स्वतंत्र सचिव व स्वतंत्र विभाग उघडून राष्ट्राचा ठेवा असलेल्या राज्यातील जेष्ठ नागरिकांना न्याय द्यावा अशीही जेष्ठ नागरिकांनी या मेळाव्यात मागणी केली. जेष्ठ नागरिकांचे सुटलेले व न सुटलेले प्रश्न यावर राज्याध्यक्ष अरुण रोडे यांचे भाषण झाले, धोंडीराम राजपूत यांनी साने गुरुजी यांची प्रार्थना' खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे' व ज्ञानेश्वर माऊलींचे पसायदान सादर केले.

या मेळाव्यात महाराष्ट्र राज्य नागरिक महासंघ (फेस्कॉम)चे अध्यक्ष अरुण रोडे, मराठवाडा विभागाचे अध्यक्ष अशोक तेरकर, सचिव जयवंत सोमवाड, संपर्क सचिव धोंडीरामसिंह राजपूत (वैजापूर), पुणे जेष्ठ नागरिक महासंघ अध्यक्ष चंद्रकांत महामुनी,जालना जेष्ठ नागरिक संघ अध्यक्ष तुळशीराम पाटील, रावसाहेब ढवळे, उपाध्यक्ष अंकुश राऊत, संस्थापक अध्यक्ष ज्ञानदेव पायगव्हाणे, सचिव राजकुमार बुलबुले, उपाध्यक्ष धर्मा खिल्लारे, कोषाध्यक्ष के.बी. मिसाळ, डॉ. रवीप्रकाश उजवणे, सुनील भाई रायठ्ठा व ना.ना. इंगळे, जेष्ठ पत्रकार घनश्याम वाणी, उत्तमराव साळुंके, साहेबराव साळुंके, प्रा.डी. एस. गायकवाड यांच्यासह विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, नाशिक विभागातील जेष्ठ पुरुष व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. गाव तेथे जेष्ठ नागरिक संघ स्थापन करून करावेत असा संकल्प ही या मेळाव्यात करण्यात आला.

# छत्रपती संभाजीनगर येथे राज्य पुरस्कार प्राप्त धोंडीरामसिंह राजपूत यांचा सपत्नीक सत्कार



वैजापूर, दि. १८ (प्रतिनिधी) - येथील सामाजीक कार्यकर्ते धोंडीरामसिंह धन्नूसिंह राजपूत यांना महाराष्ट्र शासनाचे दोन पुरस्कार अनुक्रमे पदमश्री दादासाहेब गायकवाड राज्यातून एकमेव पुरस्कार व दुसरा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व समाजकल्याण मंत्री संजय बनसोडे व सचिव सुमंत भांगे यांच्या हस्ते नुकताच प्राप्त झाला आहे.

त्या प्रित्यर्थ शनिवार (ता.१६) रोजी छत्रपती संभाजीनगर येथील सकल राजपूत समाजाच्या वतीने राजपूत यांचा व पत्नी सौ. सुनंदा राजपूत यांचा सपत्नीक सत्कार व अभिनंदन करण्यात आले. यात प्रामुख्याने अखिल भारतीय राजपूत फोरमचे सचिव पदमसिंह राजपूत, सहसचिव प्रो. डॉ. गुरुदत्तसिंह राजपूत, सेवा निवृत्त पोलीस अधिकारी राजुसिह राजपूत (ढाकरे) राजुसिह राजपूत, एस.टी.चे अधिकारी विजयसिंह राजपूत, जि.प.चे अधिकारी पदमसिंह नारायणसिंह राजपूत, राजेंद्रसिंह राजपूत, विशालसिंग राजपूत, अक्षय राजपूत, शुभम राजपूत, शीतल राजपुत, प्रकाशसिंग राजपूत, यांच्यासह शहरातील सर्व राजपूत परिवार यांनी सत्कारमूर्तींचा सपत्नीक सत्कार केला.

# रणदीप हुड्डा घेऊन येतोय 'स्वातंत्र्यवीर सावरकर'

**स्वातंत्र्य** लढ्यातील सेनानी, महान क्रांतिकारक, समाजसुधारक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर. एक विलक्षण व्यक्तिमत्व. सावरकर हे प्रखर राष्ट्रभक्त असल्याने त्यांच्या मनात स्वातंत्र्याबद्दलचा जाज्वल्य विश्वास होता. त्यांनी अस्पृश्यता निर्मूलन, सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी, राष्ट्र उन्नतीसाठी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. त्याचे हे अमूल्य योगदान प्रेक्षकांना पडद्यावर अनुभवायला मिळणार आहे. नुकताच 'स्वातंत्र्यवीर सावरकर' या मराठी चित्रपटाचा ट्रेलर लॉंच सोहळा ज्या ठिकाणी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे महाविद्यालयीन शिक्षण झाले, त्याच पुण्यातील फर्ग्युसन




महाविद्यालयात संपन्न झाला. यावेळी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची भूमिका साकारणारे रणदीप हुड्डा यांच्यासह चित्रपटाची टीम उपस्थित होती.

आनंद पंडित मोशन पिक्चर्स, लिजण्ड स्टुडिओज, अवाक फिल्म्स आणि रणदीप हुड्डा फिल्म्स प्रस्तुत हा चित्रपट झी स्टुडिओजच्या सहकार्याने प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटची कथा, पटकथा आणि संवाद उत्कर्ष नैथानी आणि रणदीप हुड्डा यांनी लिहिले आहेत. या चित्रपटात अंकिता लोखंडे हिने सावरकर यांच्या पत्नीची भूमिका साकारली आहे.

सध्या या चित्रपटाची सगळीकडे जोरदार चर्चा सुरु आहे. त्यात ट्रेलरमधील दमदार स्टारकास्ट, उत्तम कथानक, संवाद, दिग्दर्शन पाहून प्रेक्षक आता या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहात आहेत. देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या सर्व वीरांना आदरांजली वाहण्यासाठी 'स्वातंत्र्यवीर सावरकर' हा बायोपिक हुतात्मा दिनाच्या पूर्वसंध्येला प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट मराठी आणि हिंदी भाषेत प्रदर्शित होणार आहे.

चित्रपटाबद्दल रणदीप हुड्डा म्हणतात, ' स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे नाव शाळेपासूनच सर्वांना माहित असते. परंतु या नावाबद्दलची, त्यांच्या कार्याबद्दलची माझी उत्सुकता प्रचंड वाढत गेली आणि मी त्यांच्याविषयी सगळी माहिती मिळवू लागलो. मी वाचन केले, काही व्हिडीओज पहिले. हे सगळे करत असतानाच त्यांच्या योगदानावर चित्रपट करावा, हे माझ्या मनात आले आणि अखेर हे स्वप्न आता पूर्ण होतेय. आज याचा विशेष आनंद आहे की, सावरकरांचे शिक्षण याच महाविद्यालयातून झाले आणि त्यांचा मराठी ट्रेलर आम्ही याच ठिकाणी प्रदर्शित करतोय. त्यांचे कार्य, योगदान चित्रपटरूपात प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने आम्ही ही निर्मिती केली आहे !

# श्री.१००८ नंदीश्वर दिगंबर जैन अतिशय क्षेत्र पांचाळेश्वर येथे वार्षिक यात्रा महोत्सवाचे आयोजन वार्षिक यात्रा महोत्सवासाठी छत्रपती संभाजीनगर येथुन मोफत बसेस

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) - लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले श्री.१००८ नंदीश्वर दिगंबर जैन अतिशय क्षेत्र पांचाळेश्वर येथे दिनांक १९ मार्च रोजी वार्षिक यात्रा महामहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. संपुर्ण कार्यक्रम हा आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव, आचार्य मयंकसागरजी गुरुदेव, पुर्णचंद्रसागरजी महाराज, क्षुल्लक ऐश्श्वर्यसागरजी महाराज यांच्या आर्शिवादाने होत आहे.

यात्रेसाठी नंम्ररसागरजी महाराज, मोक्ष सागरजी महाराज, क्षुल्लिका नंम्रमती माताजी, क्षुल्लिका सुदिव्यश्री माताजी, क्षुल्लिका सर्वज्ञमती माताजी यांच्या आर्शिवादाने होत आहे. दिनांक १७ ते १९ मार्च पर्यत लघुपंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व प्रथम दिनांक १९ मार्च रोजी सकाळी ७.३० वाजता नंदीश्श्वर विधान, सकाळी १० वाजता ध्वजारोहन सौ.निर्मला माणिकचंदजी सौ दिपाली महेंद्र सौ. सुवर्णा जितेंद्र पहाडे परिवार छत्रपती संभाजीनगर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे, भगवंताचा अभिषेक, पुजन, प्रवचन, आदी धार्मिक कार्यक्रम होणार आहे. यावेळी भव्य डोमचे लोकार्पण बनारसी बाई प्रकाशचंद स्व,ताराबाई,



सुभाषचंद, सौ. हर्षिका संदेश आराध्या देवांश पहाडे परिवार नागपुर यांच्या वतीने होणार आहे. यावेळी उपस्थित भाविकांना अशोक राजेंद्र प्रशांत अनिल सागर प्रविण कासलीवाल परिवार छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणर आहे. संपुर्ण कार्यक्रम हा शिखरचंद जैन शिरड शहापुर यांच्या साग्र संगीतामध्ये होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन कचरु लालजी कपुरचंद पाटणी जालना हे राहणार आहे. तर प्रमुख अतिथी म्हणुन पालकमंत्री संदीपानजी भुमरे हे राहणार आहे तसेच आमदार लक्ष्मण पवार, आमदार बदामराव पंडीत, आमदार अमरसिंग पंडित, भाउसाहेब नाटककर, विकास शेळके, मदनराव कोठी हे उपस्थित राहणार आहे. पंचरंगी पत्रिकेसाठी अजित राजेंद्र संजय सेठी परिवार पाचोड वाला यांचे सहकार्य मिळाले आहे.

वार्षिक यात्रा महोत्सवासाठी छत्रपती संभाजीनगर, अरिहंतनगर, बालाजीनगर, बजाजनगर, शिवाजीनगर, गेवराई, पाचोड आदी ठिकाणाहुन मोफत बसेस ठेवण्यात आल्या आहेत. तरी समाज बांधवांनी वार्षिक यात्रेस उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष गौतमचंद काला, सचिव भाऊसाहेब बाकलीवाल, कोषाध्यक्ष संजय सेठी, उपाध्यक्ष डॉ.सुगंधचंद कासलीवाल, वृषभ गंगवाल, ॲड.सुहास चुडीवाल, सहसचिव विजय पापडीवाल, कैलास खोबरे, विश्श्वस्थ माणिकचंद सेठी, विलास पहाडे, भगवानदास काला, अशोक कासलीवाल, डॉ राजेंद्र काला, संतोष अजमेरा, हिरालाल धोदलकर, कार्यकारणी अध्यक्ष सुनिल पाटणी यांनी केले असल्याची माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली. सर्व धर्म प्रेमी यांनी धर्म लाभ घ्यावा.

# श्री. एकलिंगजी सेवा समिती मलकापूरच्या वतीने राजपूत यांचा सन्मान व सत्कार



वैजापूर, दि. १८ (प्रतिनिधी) - राजपूत समाजाच्या मलकापूर येथील श्री. एकलिंगजी सेवा समितीच्या कार्यकारिणी सदस्य यांनी सोमवार (ता.१८) रोजी वैजापूर येथे येऊन राज्य शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांचा सपत्नीक सन्मान करून अभिनंदन केले. समितीचे अध्यक्ष पी.डी.राजपूत, सदस्य सर्वश्री चंदनसिंग गोपालसिंग राजपूत, संजय गोपालसिंग राजपूत, राजेंद्रसिंग राजपूत, विठ्ठलसिंग राजपूत समयी राजपूत यांच्या पत्नी सौ. सुनंदा राजपूत, मुलगा सोनोलॉजिस्ट डॉ. सचिन धोंडीरामसिंह राजपूत, सून सौ. पल्लवी सचिन राजपूत व नातू रिदान राजपूत उपस्थित होते.

# जालना येथील जेष्ठ नागरिकांच्या विभागीय मेळाव्यात राज्य पुरस्कार प्राप्त धोंडीरामसिंह राजपूत यांचा सत्कार

वैजापूर, दि. १८ (प्रतिनिधी) - येथील वैजिनाथ जेष्ठ नागरिक सेवा संघाचे सचिव तथा सामाजिक कार्यकर्ते व स्वच्छतादूत धोंडीरामसिंह राजपूत यांना महाराष्ट्र शासनाने राज्याच्या ३६ जिल्ह्यातून त्यांच्या सामाजिक, साहित्यिक, कृषी, शिक्षण, आमचा गाव-आमचा विकास, पाणी अडवा-पाणी जिरवा, स्वच्छता विषयक क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांची एकमेव निवड करून त्यांना पदमश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार व दुसरा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार देऊन राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे. उपमुख्यमंत्री ना. अजित दादा पवार, समाजकल्याण मंत्री ना ,संजय बनसोडे, व सचिव सुमंत भांगे यांच्या हस्ते हे राज्यातील सर्वोच्च सामाजिक सेवेचे पुरस्कार



देऊन मुंबई येथे त्यांचा सन्मान केला.

या प्रित्यर्थ जालना येथे रविवार(ता,१७) रोजी मराठवाडा विभागीय जेष्ठ नागरिक मेळाव्यात महाराष्ट्र राज्य जेष्ठ नागरिक महासंघ(फेस्कॉम) चे राज्याध्यक्ष अरुण रोडे, पुणे विभागीय जेष्ठ नागरिक संघ अध्यक्ष चंद्रकांत महामुनी, मराठवाडा विभागिय जेष्ठ नागरिक संघ अध्यक्ष अशोक तेरकर, सचिव जयवंत सोमवाड, माजी अध्यक्ष ना.ना. इंगळे व जालना जेष्ठ नागरिक संघ अध्यक्ष तुळशीराम पाटील, यांनी राजपूत यांचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी जालनाचे जेष्ठ पत्रकार रावसाहेब ढवळे, ज्ञानदेव पायगव्हाणे, श्री. खिल्लारे, अंकुश राऊत व वैजापूर आधार जेष्ठ नागरिक संघ चे उत्तमराव साळुंके, जेष्ठ पत्रकार व सचिव घनश्याम वाणी, प्रा.डी.एस. गायकवाड, चैतन्य जेष्ठ नागरिक संघाचे साहेबराव साळुंके यांच्या सह मराठवाडा विभागातील जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षणामुळेच महिलांनी सर्वच क्षेत्रात क्रांती केली - मनोरमा तिजारे

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) - आज महिला सर्वच क्षेत्रात स्वकर्तृत्वाने तळपत आहे. असे कोणतेच क्षेत्र उरलेले नाही की, ज्या ठिकाणी महिलांनी आपला ठसा उमवटलेला नाही. त्यांना संधी मिळाली की, त्या संधीचे सोने करतात हे सातत्याने सिध्द झाले. आणि ते फक्त शिक्षणामुळेच महिलांनी च क्षेत्रात क्रांती केली असल्याचे प्रतिपादन मनोरमा तिजारे यांनी केले.

त्या अजिंक्य केसरी मिडीया ग्रुप व सिद्धार्थ एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त सुभेदार रामजी आंबेडकर हायस्कूलमध्ये श्रीमती तिजारे बोलत होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला थोर क्रांतीकारी महिलांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात केली. व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती मनोरमा तिजारे, प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती जयश्री सोनकवडे (उपायुक्त : प्रादेशिक कार्यालय समाजकल्याण, छ. संभाजीनगर), श्रीमती नंदा गायकवाड (उपायुक्त : मनपा छ. संभाजीनगर), श्रीमती प्रमिला गायकवाड (सचिव: सिद्धार्थ एज्युकेशन सोसायटी), श्रीमती सुजाता गायकवाड, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

व्यासपीठावरील पाहुण्यांनी महिलांनी सकारात्मक विचार करण्यावर भर देण्याचे आवाहन केले. तसेच महिला एकजुटीची ताकद सर्वाना दिसत आहे असेही यावेळी नमुद करण्यात आले. या जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना कर्तृत्ववान महिला पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये श्रीमती जयश्री सोनकवडे, श्रीमती नंदा गायकवाड, श्रीमती प्रमिला विठोबा गायकवाड, श्रीमती सुजाता बन्सी गायकवाड, श्रीमती लक्ष्मी समाधान वाणी, जागृती दिपक सुर्यवंशी, श्रीमती जया उमेश नेमाडे, प्रिती श्रीपतराव बनसोडे, डॉ. तक्षशिला बनसोडे, ॲड. सुप्रिया कनगरे, श्रीमती कमलाबाई कारभारी त्रिभुवन, श्रीमती कमलाबाई प्रल्हाद नरवडे, श्रीमती संगितताई मदन भगत, श्रीमती सुनिता सुनिल गोराडे, श्रीमती पुष्पाताई बबनराव गायकवाड, श्रीमती जयश्री रावसाहेब थाले आदी महिलांना कर्तृत्ववान महिला पुरस्कार सन्मानपुर्वक प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिपक बनसोडे यांनी केले. सूत्रसंचालन कविता वाहूले यांनी केले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने महिलांनी उपस्थिती दर्शवली.

# हडको चंद्रप्रभू खंडेलवाल जैन मंदिर येथे सिध्दचक्र महामंडळ विधानाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) - श्री.१००८ चंद्रप्रभु खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर एन ११ टि.व्ही सेंटर येथे दिनांक १७ मार्च ते २४ मार्च पर्यत सिध्दचक्र महामंडळ विधानाचे आयोजन अष्टानिका पर्वा निमीत्त करण्यात आले आहे. यामध्ये दररोज भगवंताचा अभिषेक, सिध्दचक्र महामंडळ पुजा, विधान, आरती, होणार आहे. यामध्ये या विधानात इंद्र इंद्राणी होण्याचा मान अरुणाबाई रमेशचंद छाबडा यांना मिळाला आहे. तसेच दररोज नविन इंद्र इंद्राणी च्या वतीने भगवंताची पुजा आरती करण्यात येणार आहे. संपुर्ण विधानासाठी हडको समाजाच्या वतीने श्रीफळ व पुजन सामुग्री देण्यात येणार आहे. तरी समाज बांधवांनी या आठ दिवसीय विधानात सहभाग नोंदवावा असे आवाहन मंदिराचे अध्यक्ष कैलास कासलीवाल, सचिव सुरजमल छाबडा, प्रकाश ठोले, अशोक अजमेरा, पंकज छाबडा व नितेश कासलीवाल, राजकुमार बडजाते सतोष पाटणी कविता अजमेरा भारती बाकलीवाल व मंडळाने केले.

सोमवार खेरीज दररोज
प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक
श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी; जिल्हाधिकाऱ्यांकडून मनाई आदेश जारी



छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यासोबतच जिल्ह्यात निवडणूक आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी सुरु झाली असून त्याच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी, जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी विविध मनाई आदेश जारी केले आहेत.

**खाजगी इमारत, भिंत इ. चा निवडणूक प्रचार वापरास पूर्व परवानगी आवश्यक**

निवडणूक प्रचारासाठी कोणत्याही व्यक्तिगत जागा, इमारत, आवार, भिंत इ. चा वापर संबंधित मालकाच्या परवानगी शिवाय तसेच संबंधित परवाना देणाऱ्या प्राधिकरणाच्या परवानगी शिवाय वापर करण्यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३(१) अन्वये निर्बंध घालण्यात आले आहेत.

**नमूना मतपत्रिका छपाईस निर्बंध**

निवडणूक प्रचारा दरम्यान राजकीय पक्षाने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने, त्यांच्या प्रतिनिधींनी, हितचिंतकांनी, मुद्रणालयाच्या मालकांनी, प्रकाशकांनी नमुना मतपत्रिका छापतांना उमेदवाराचे नाव, नेमून देण्यात आलेली चिन्हे, आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद, आकार वापरणे इ. करण्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम १२७ (क) अन्वये निर्बंध घालण्यात आले आहे.

**ध्वनीक्षेपकाच्या वापरास निर्बंध**

निवडणूक प्रचारादरम्यान ध्वनीक्षेपकाचा वापर करण्याबाबत निर्बंध घालण्यात आले आहे. त्यात संबंधित पोलीस अधिकारी यांच्या परवानगीशिवाय ध्वनीक्षेपकाचा वापर करणे, सकाळी ६ वाजण्यापूर्वी व रात्री १० वाजेनंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर करण्यास मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे ३३ (एन) अन्वये निर्बंध असून सर्व राजकीय पक्ष, उमेदवार, व्यक्ति यांनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपक वापर करण्याबाबत घेतलेल्या परवानगीची माहिती संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेस बंधनकारक आहे.

**प्रचार साहित्यामुळे रहदारीस अडथळा करण्यास निर्बंध**

निवडणूक प्रचारादरम्यान लावण्यात येणाऱ्या पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट, कटआऊट, पेंटिंग, होर्डिंग, कमानी, घोषवाक्य लिहिणे इ. रहदारीस अडथळा होईल अशा पद्धतीने लावण्यास मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे ३३(१)(घक) अनवये निर्बंध घालण्यात आले आहेत.

**शासकीय इमारत, आवार, परिसराचा प्रचारासाठी वापर करण्यास निर्बंध**

निवडणूक प्रचारादरम्यान जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, तहसिलदार कार्यालये, शासकीय, निमशासकीय कार्यालये, विश्रामगृहे यांच्या इमारत, आवार व परिसरात निवडणूक प्रचारासाठी कोणत्याही प्रकारे वापर करण्यास फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये निर्बंध घालण्यात आले आहेत.

**नामनिर्देशन दाखल करतांनाचे निर्बंध**

उमेदवारांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात नामनिर्देशन दाखल करतांना, पाच पेक्षा जास्त व्यक्तिं निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात उपस्थित असणे, नामनिर्देशन दाखल करते वेळी कार्यालय परिसरात मिरवणूक, सभा घेणे, घोषणा देणे, वाद्य वाजवणे इ. प्रकारे प्रचार करण्यास तसेच कार्यालयाच्या १०० मिटर परिसरात तीन पेक्षा जादा वाहने आणण्यास फौजदार प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रतिबंध घालण्यात आले आहेत.

**शस्त्र बाळगण्यास निर्बंध**

निवडणूक जाहीर झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत शस्त्र परवानाधारकांना शस्त्र बाळगण्यास- वापरण्यास, शस्त्र परवाना देण्यास बंदी घालण्यात आली आहे. फौजदार प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (अ) अन्वये हे निर्बंध घालण्यात आले आहेत.

**कार्यालय परिसरात आंदोलन करण्यास निर्बंध**

निवडणूक जाहीर झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जिल्हाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, तहसिलदार या सर्व कार्यालयांच्या परिसरात उपोषण , मोर्चा, निदर्शने, घेराव इ. आंदोलने करण्यास फौजदार प्रक्रिया संहिता १९७३ चे कलन १४४ अन्वये मनाई करण्यात आली आहे.

**सक्षम प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय वाहनांवर झेंडे, बॅनर इ.लावण्यास निर्बंध**

निवडणूक प्रचारादरम्यान सक्षम प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय वाहनांवर झेंडे, बॅनर, बोधचिन्ह इ. लावणे, घोषवाक्य लिहिण्यास मनाई करण्यात आली आहे.

वरील सर्व निर्बंध, मनाई आदेश हे निवडणूक जाहीर झाल्यापासून (दि.१६ मार्च) ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत (दि.६ जून) पर्यंत अंमलात राहतील,असेही जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी दिलीप स्वामी यांनी स्पष्ट केले आहे.

# लोकसभा निवडणूक २०२४; आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी

## राजकीय पक्ष प्रतिनिधी; विभागप्रमुखांना जिल्हाधिकाऱ्यांनी दिली माहिती



छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला असून निवडणूक आदर्श आचारसंहिता अंमल सुरु झाला आहे. याबाबत करावयाच्या उपाययोजनांबाबत नोडल अधिकारी तसेच याकालावधीत राजकीय पक्षांनी पाळावयाची नियमावली याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी माहिती देऊन मार्गदर्शन केले.

यासंदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजन सभागृहात बैठक पार पडली. सकाळच्या सत्रात सर्व नोडल अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, मनपा अपर आयुक्त रणजीत पाटील तसेच विविध विभागप्रमुख आदी उपस्थित होते.

नोडल अधिकाऱ्यांनी तसेच विभागप्रमुख व त्यांच्या अधिनस्त कार्यालयांच्या परिसरात कोणत्याही राजकीय पक्षाचे पोस्टर्स, बॅनर्स, झेंडे आदी साहित्य तात्काळ हटविण्यात यावे. कार्यालयीन कामकाज करतांना आदर्श आचारसंहितेचे पालन व्हावे,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिली.

दुपारच्या सत्रात झालेल्या राजकीय पक्ष प्रतिनिधींच्या बैठकीत , राजकीय पक्षांना आचारसंहिते विषयी सविस्तर माहिती देण्यात आली. मतदारांसाठी देण्यात येत असलेल्या मतदान केंद्रावरील सुविधा, मतदार संख्या,मतदार सहायता कक्ष, नामनिर्देशन, जाहिरात प्रमाणीकरण, खर्च निरिक्षण इ. विविध मुद्यांवर सादरीकरणाद्वारे संबंधित नोडल अधिकाऱ्यांनी व जिल्हाधिकारी स्वामी यांनी माहिती दिली. निवडणूक कालावधीत प्रचार करतांना सामाजिक सौहार्द व सलोखा अबाधित ठेवून प्रचार करावा असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी राजकीय पक्ष प्रतिनिधींना केले.

# इम्तियाज जलील छत्रपती संभाजीनगरमधून लढणार

## असदुद्दीन ओवेसींकडून उमेदवारी घोषित



छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणुकीच्या तारखांची घोषणा झाल्यानंतर आता सर्वच राजकीय पक्षांनी निवडणुकीची जोरदार तयारी सुरू केली आहे. उमेदवारांबाबत भारतीय जनता पक्षाच्या दोन तर काँग्रेसची एक यादी देखील जाहीर झाली आहे. त्यातच आता एमआयएमने देखील आपल्या तीन उमेदवारांची घोषणा केली आहे. महाराष्ट्रातून खासदार इम्तियाज जलील यांना पक्षाध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांनी उमेदवार घोषित केली आहे. एका पत्रकार परिषदेमध्ये बोलताना ओवेसी यांनी तीन उमेदवारांच्या नावाचा उल्लेख केला. त्यानुसार औरंगाबाद मधून एमआयएमचे विद्यमान खासदार इम्तियाज जलील हे एमआयएमचे उमेदवार असतील. तर हैदराबाद लोकसभा मतदारसंघातून आपण स्वतः उमेदवार असू, असे देखील असदुद्दीन ओवेसी यांनी म्हटले आहे.

एमआयएमचे राष्ट्रीय अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांनी तीन नावांची घोषणा करत आगामी लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील आणखी काही जागांवर उमेदवार उभे करणार असल्याचे संकेत दिले आहेत. या संदर्भातली स्पष्ट भूमिका आणि उमेदवारांची नावे हे आमचे प्रदेशाध्यक्ष जाहीर करणार असल्याचे देखील ओवेसी यांनी सांगितले आहे. महाराष्ट्रातील किती जागांवर एमआयएम उमेदवार उभे करणार हे जरी ओवेसी यांनी सांगितले नसले तरी पक्ष महाराष्ट्रात सहा जागांवर निवडणूक लढवणार असल्याचे आधीच पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार इम्तियाज जलील यांनी सांगितले होते. त्यानुसार एमआयएम कोणाला तिकीट देणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जेसीबीचा धक्का लागून जलवाहिनी फुटली; लाखो लिटर पाण्याची नासाडी

जायकवाडी दि.१८ (प्रतिनिधी)- जायकवाडी धरणातून छत्रपती संभाजीनगर येथील शेंद्रा एमआयडीसीला पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन आज दुपारी १ वाजेच्या सुमारास पिंपळवाडी फाट्यावर फुटली. यामुळे लाखो लीटर पाण्याची नासाडी झाली आहे. तसेच रस्त्यावरील दुकानात पाणी गेल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. यामुळे रस्त्याला नदीचे स्वरूप आले होते.

जायकवाडी धरणातून शेंद्रा एमआयडीसीला ९०० मिमी व्यासाच्या पाइपलाइनने पाणीपुरवठा केला जातो. आज दुपारी एक वाजेच्या दरम्यान येथे जेसीबीच्या सहाय्याने पाइपलाइन दुरूस्तीचे काम सुरू होते. यावेळी जेसीबीचा धक्का लागल्याने शेंद्रा एमआयडीसीला पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन फुटली. लागलीच पाण्याचा उंच फवारा उडाला, लाखो लिटर पाण्याची नासाडी झाली. पाण्याचा फवारा आणि रस्त्याला नदीचे स्वरूप आल्याने दोन्ही बाजूची वाहतूक एक तास खोळंबली होती.


जा.क्र. नपवै/कावि/४/२०२४/५४०
**कार्यालय नगर परिषद वैजापूर**
जिल्हा :- छत्रपती संभाजीनगर
दिनांक : १८/०३/२०२४

**जाहिर प्रगटन**

वैजापूर शहरातील सर्व नागरिकांना/व्यवसायीकांना व राजकीय पक्ष यांना जाहिर आवाहन करण्यात येते कि, वैजापूर नगर परिषदेने पोस्टर बॅनर लावण्यासाठी खालीलप्रमाणे जागा निश्चित करण्यात आली असून सदर ठिकाण पोस्टर बॅनर लावण्यासाठी रितसर परवानगी घ्यावी.

१) पोलिस स्टेशन रोड कॉर्नर
२) म्हसोबा चौक
३) बस स्थानक भाग
४) छत्रपती शिवाजी महाराज चौक
५) पंचायत समिती
६) आंबेडकर चौक
७) शनी मंदिर

सदर ठिकाणी पोस्टर बॅनर लावण्यासाठी First come first serve या तत्वावर सर्वांना समानसंधी उपलब्ध करून देण्यात येईल तरी नागरिक राजकिय पक्षानी शहरात या ठिकाणा व्यतिरिक्त इतर ठिकाणी पोस्टर बॅनर लावल्यास आचार संहिता भंगाचा गुन्हा दाखल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत/ -**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वैजापूर**


# जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या मुलाखतीचे उद्या आकाशवाणीवर प्रसारण

## लोकसभा निवडणुकीबाबत मतदारांना देणार माहिती



छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला आहे. या निवडणूकीसंदर्भात जिल्ह्यातील मतदारांना अधिक माहिती व्हावी, तसेच मतदारांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी हे बुधवार दि.२० रोजी सकाळी साडेदहा वा. आकाशवाणीवरुन माहिती देणार आहेत.

सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्ह्यातील निवडणूक व्यवस्था, मतदार, मतदारांना द्यावयाच्या सुविधा, आदर्श आचारसंहितेचे पालन, मतदारांमध्ये जागृती करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांची मुलाखत आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रात ध्वनिमुद्रित करण्यात आली. जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी ही मुलाखत घेतली आहे. आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्र एफएम १०१.७ मेगा हर्टझवरुन बुधवार दि.२० मार्च रोजी सकाळी साडेदहा वा. प्रसारित होणार आहे. ही मुलाखत *airchhatrapatisambhajinagar* या ट्यूब चॅनलवरही ऐकता येणार आहे. जिल्ह्यातील लोकसभा निवडणूकीसंदर्भात सखोल चर्चा या मुलाखतीत करण्यात आली आहे. छत्रपती संभाजी नगर जिल्हावासियांनी ही मुलाखत ऐकावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# राजपूत युवक क्षत्रिय संघटना यांच्या वतीने वैजापूर येथे धोंडीराम राजपूत व यश राजपूत यांचा सत्कार



वैजापूर दि.१८ (प्रतिनिधी)- यश धीरजसिंह राजपूत यांनी सायबर सेक्युरिटी मध्ये आयर्लंड येथून एम,एस, पदव्युत्तर पदवी प्राप्त केली व वैजापूर भूषण ठा.धोंडीरामसिंह राजपूत यांना महाराष्ट्र शासनाने सामाजिक कार्य क्षेत्रातील दोन सर्वोच्च पुरस्कार (१)- राज्यातून एकाच व्यक्तीला दिला जाणारा पदमश्री दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड व (२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार देऊन गौरविले त्या प्रित्यर्थ येथील राजपूत युवक क्षत्रिय संघटना तर्फे सोमवार (ता.१८)रोजी संघटनेच्या वतीने भव्य सत्कार करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. सत्कारचे उत्तर देताना राजपूत म्हणाले की, दोन्ही पुरस्कार राजपूत-परदेशी समाजाचे असुन मी ते समाजाला समर्पित करीत आहे. माझे शहर व तालुका वासीयांना समर्पित करीत आहे,हा सर्व समाजाचा पुरस्कार व मान सन्मान आहे. आधी समाज व नंतर मी असेही राजपूत म्हणाले. या प्रसंगी सर्वश्री संजयसिंग राजपूत,धिरजसिंह राजपूत,पदमसिंह राजपूत (खबाला), दिनेश राजपूत,सोनू पदमसिंग राजपूत,योगेश राजपूत, नारायण राजपूत, मनोज राजपूत,सुमित बळीराम राजपूत,सचिन सुरजमल राजपूत, स्वप्नील राजपूत, ऋषीकेश इंदलसिंग राजपूत युवराज शरद राजपूत,मयूर राजपूत,सोनू राजपूत, यांच्या सह राजपूत युवक क्षत्रिय संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.


जा.क्र.नपवै/कावि/४/२०२४/५३९
**कार्यालय नगर परिषद वैजापूर**
जिल्हा :- छत्रपती संभाजीनगर
दिनांक :- १८/०३/२०२४

**जाहिर प्रगटन**

वैजापूर शहरातील सर्व राजकिय पक्षांना जाहिर आवाहन करण्यात येते कि, वैजापूर नगर परिषदेने वैजापूर शहरात खालीलप्रमाणे राजकिय पक्षांच्या सभेसाठी खालील जागा निश्चित केलेल्या आहे.

१) आठवडे बाजार तळ (सोमवार बाजार दिवस वगळून सभेची परवानगी देण्यात येईल.)
२) जिल्हा परिषद मुलांची शाळा (मा. मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.छ. संभाजीनगर यांच्या पूर्व परवानगीने
३) खाजगी संस्था/खाजगी जागा संस्था/ खाजगी जागा मालक यांच्या पूर्व परवानगीने.

सदर ठिकाणी सभा घेण्यासाठी First come first serve या तत्वावर सर्वांना समानसंधी उपलब्ध करून देण्यात येईल. तरी नागरिक / राजकिय पक्षांनी शहरात या ठिकाणा व्यतिरिक्त इतर ठिकाणी सभा घेतल्यास आचार संहितेचा भंगाचा गुन्हा दाखल होईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत/ -**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वैजापूर**


### अखेर 'वंचित'शिवाय महाविकास...

राज्यांमध्ये २२ जागा लढवणार असून शरद पवार गट १० जागांवर, तर काँग्रेस १६ जागांवर निवडणूक लढवणार आहे. त्यामुळे ठाकरे गटाकडून हातकणंगले जागा राजू शेट्टी यांना सोडली जाऊ शकते. महाविकास आघाडी राजू शेट्टी यांना बाहेरून पाठिंबा देईल, अशी चिन्हे आहेत. दुसरीकडे, सांगली जागेवरून काँग्रेस आणि ठाकरे गटात रस्सीखेच सुरुच आहे.

### वय झाले म्हणून साथ सोडणे मला...

यावेळी श्रीनिवास पवार यांनी अजित पवार यांच्यावर निशाणा साधला आहे. जमीन आपल्या नावावर केली म्हणून त्यांना घराबाहेर काढायचे नाही. आपण औषध विकत आणतो तेव्हा त्यावर एक्सपायरी डेट असते. तशी नात्यांची देखील एक्सपायरी डेट असते. आता वाईट वाटून घ्यायचं नाही. मला दबून जगायचं नाही, जगायचं तर स्वाभिमानाने, अशी भावना श्रीनिवास पवार यांनी व्यक्त केली.

### राहुल गांधींची सभा म्हणजे फॅमिली गॅदरिंग;...

काळाचा दिवस आहे, असेच आम्ही म्हणतो.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, विश्वास गमावलेला विरोधीपक्ष काल सभेत दिसून आला. त्यांच्यात कोणताही समन्वय नव्हता. त्यांच्याकडे कोणतीही नीती, अजेंडा नाही केवळ मोदींचा व्यक्तीद्वेष दिसून आला. विरोधकांकडे पंतप्रधानपदाचा उमेदवार म्हणून चेहरा नाही साधा उमेदवार देखील ते जाहीर करू शकत नाही. केवळ एकमेकांकडे पाहतात. त्यांच्याकडे कोणताही विश्वास राहिलेला नाही. विश्वास गमावलेल्या लोकांचे भविष्य आहे तरी काय, असा हल्लाबोल शिंदे यांनी राहुल गांधी यांच्या सभेतील नेत्यांवर केला.

जर देशात लोकशाही नसती तर राहुल गांधी काल मुंबईत सभा घेऊन मोदींविरोधात बोलू शकले असते का? पण केवळ लोकशाही वाचविण्याच्या बाता केल्या जातात. पण देशात मजबूत लोकशाही आहे, हे देखील विरोधकांनी समजून घेतले पाहिजे, असा सल्ला देखील शिंदे यांनी विरोधकांना दिला.

### सोनिया गांधींना भेटलोच नाही;...

सोनिया गांधींसमोर अक्षरशः रडले अशी टीका राहुल गांधी यांनी केली होती. मी या शक्तीसमोर लढू शकत नाही, मला तुरुंगात जायचं नाही असं त्या नेत्यांने सांगितल्याचं राहुल गांधी यांनी म्हटलं होतं. त्यावर प्रतिक्रिया देताना तर राहुल गांधींचं वक्तव्य हास्यास्पद असून मी सोनिया गांधींना भेटलो नाही, असं अशोक चव्हाण म्हणाले.

### फडणवीस घरफोडे नेते;...

अच्छे दिन नाही तर सच्चे दिन येणार असल्याचे सांगत देशाला भाजपची कीड लागली असल्याची टीका देखील उद्धव ठाकरे यांनी केली आहे. सगळ्यांची घरे तुम्ही फोडत आहात, पक्ष तुम्ही फोडत आहात, तुमच्या पक्षांमध्ये घरफोडे तयार झाले आहेत. त्यामुळे तुमच्या पक्षात नेतेच तयार झाले नसल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे. त्यामुळे तुमच्याकडे नेत्यांचा आदर्श सोडा उलट आदर्शवादी नेते तुम्ही घेत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला. या माध्यमातून त्यांनी अशोक चव्हाण यांच्यावरही निशाणा साधला.